# प्रकरण चौथे

## अध्ययन क्षेत्र व वैशिष्टये

# प्रकरण चौथे

## अध्ययन क्षेत्र व वैशिष्टये

महाराष्ट्रातील एकूण जिल्ह्यातील सोलापूर हा एक जिल्हा आहे. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ १४८४५ चौ.कि.मी. आहे. १५०१ हजार हेक्टर भौगोलिक क्षेत्र आहे. हा जिल्हा एकूण ११ तालुक्यांचा बनला आहे. ते तालुके येणेप्रमाणे - १) उत्तर सोलापूर, २) दक्षिण सोलापूर, ३) अक्कलकोट, ४) मंगळवेढा, ५) सांगोला, ६) पंढरपूर, ७) माळशिरस, ८) माढा, ९) करमाळा, १०) बार्शी, ११) मोहोळ हे होत.

या जिल्ह्याच्या पश्चिमेस सातारा, पुणे व सांगली जिल्हा, कर्नाटक, पूर्वेस उस्मानाबाद जिल्हा, दक्षिणेस कर्नाटक राज्य तर उत्तरेस अहमदनगर, उस्मानाबाद जिल्हा आहे. तसेच या जिल्ह्यामधून भिमा नदी, माण नदी, नीरा सीना नदी व भोगावती या नद्या वाहतात. तसेच होटगी तलाव, हिप्परगा तलाव, सिध्देश्वर तलाव, कंम्बर तलाव, भांबूर्डी तळे (माळशिरस), वडशिवणे, मांगी तळे (करमाळा), आष्टी तळे (मोहोळ) पाथरी तळे (बार्शी) इ. लहान मोठी तळी आहेत.

सोलापूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या (हजारात) २५८८ एवढी आहे. पैकी १३३३ (हजार) पुरुष व १२५५ (हजार) स्त्रीया आहेत. सोलापूर जिल्ह्यातून जवळजवळ ४२४ कि.मी. लांबीचा रेल्वेमार्ग जातो आहे. लोकसंख्या साक्षरतेचे प्रमाण एकूण ४०.६९ टक्के आहे. त्यापैकी ५३.५६ टक्के पुरुष व २६.९३ टक्के स्त्रिया साक्षर आहेत.

सहकार व औद्योगिक क्षेत्राचा विचार करता सध्या एकूण ९ साखर कारखाने आहेत. तर इतर नोंदणीकृत कारखाने १७६७ आहेत. त्यापैकी १३१३ कारखाने सध्या सुरु आहेत. कापड व्यवसाय यासाठी सोलापूर प्रसिध्द असून याठिकाणी सूत तयार करण्याचा व्यवसाय मोठया प्रमाणात चालतो. सूत तयार करण्याचे जवळजवळ ९ कारखाने या जिल्हयात आहेत.

व्यापारी क्षेत्रामध्ये धान्यासाठी सोलापूर शहर, बार्शी, वैराग, अकलूज, अक्कलकोट, पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा या बाजारपेठा मोठया प्रमाणात उपलब्ध आहेत. ज्वारी, ऊस, कापूस, मक्का, मिरची, कांदा ही प्रमुख पिके आहेत. जिल्हयामध्ये एकूण दहा मोठी शहरे आहेत. वाहतुकीचे संबंध मोटार, ट्रक, टेम्पोने जोडले जातात. जिल्हयामधून पुणे-हैदराबाद हा राष्ट्रीय महामार्ग जातो. सोलापूर शहर हे सोलापूर जिल्हयामधील प्रमुख असे शहर आहे. पुणे-हैद्राबाद, हैद्राबाद-विजापूर पुणे-विजापूर हे प्रमुख रस्ते सोलापूरातून जातात. त्याचबरोबर पुणे-बेंगलोर, पुणे-विजापूर, पुणे-मद्रास, पुणे-हैद्राबाद, आदि लोहमार्गाचे मोठे रेल्वे स्टेशन सोलापूर शहरात आहे.

अशा सर्व सोयींनी युक्त सोलापूर जिल्हयात जिल्हयाच्या मध्यवर्ती व केंद्रस्थानी असलेल्या सोलापूर शहरालगत असणारा इतर ११ तालुक्यांपैकी एक तालुका म्हणजे उत्तर सोलापूर तालुका होय. या तालुक्यावर शहर लगत असल्याने सर्वच बाबतीत परिणाम झालेला दिसून येतो.

गेले अनेक वर्षे लोकसंख्येबरोबरच औद्योगिकरणामध्ये चौथ्या

क्रमांकाचे स्थान मिळविणाऱ्या सोलापूर शहराची १९९१ च्या शिरगणतीनुसार ७ व्या क्रमांकापर्यंत घसरण झाली आहे. सर्व जिल्हयांची लोकसंख्यावाढ २६ टक्क्यांनी वाढली असून सोलापूर शहराची लोकसंख्या २० टक्क्यांनी वाढली आहे. लोकसंख्या वाढ त्यामानाने कमी झाली. ही गोष्ट गौरवास्पद असली तरी औद्योगिकरणामध्ये ही सोलापूरची झालेली पिछेहाट गांभिर्याने दखल घ्यावयास लावणारी आहे. "उद्यमनगर" म्हणून प्रसिध्द असणाऱ्या या सोलापूरात कापड उद्योग मोठया प्रमाणात आहे. परंतु या उद्योगाची गेल्या कांही वर्षात व्हावी तशी भरभराट झाली नाही. कामगार व व्यवस्थापन यांचे संघर्ष गेल्या कांही वर्षात पराकोटीला पोहोचले. त्याचा परिणाम उत्पादनावर झाला. या संघर्षामुळे कापडाच्या उत्पादनवाढीकडे दुर्लक्ष झाले. कापड उद्योगाची वाढ खुंटल्याने सोलापूर शहरात बाहेरगांवच्या लोकांचा ओढाही कमी झाला. मुंबई व परिसरात याच काळात कापड उद्योगांनी मोठया प्रमाणात उत्पादन चालू केले. त्यामुळे ठाणे, कल्याण व नाशिक या भागात औद्योगिकरण झपाटयाने झाले. तसेच इतर भागाच्या समप्रमाणात त्यांची लोकसंख्या वाढली. त्यामुळें या तीन शहरांनी सोलापूरला मागे टाकले. सध्या सोलापूर जिल्हयाची ३२ लाख ७४ हजार ३४ इतकी लोकसंख्या असून त्यातील ११ लाख ५५ हजार ३ जण साक्षर आहे. २००० सालापर्यंत सोलापूर पुन्हा चौथ्या क्रमांकावर आणायचे म्हंटले तरी औद्योगिकरणाबरोबरच साक्षरतेकडे अधिक गांभिर्याने पाहणे गरजेचे आहे. अन्यथा येत्या १० वर्षामध्ये आणखी कांही जिल्हे सोलापूर जिल्हयास निश्चितच मागे टाकतील.

अशा सोलापूर शहरालगतचा तालुका म्हणजे उत्तर सोलापूर

सोलापूर तालुका होय. या तालुक्यास काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणतात. कारण याच तालुक्यातून आजतागायत सततपणे आमदार वा खासदार एवढेच काय पण पंचायत समिती, ग्रामपंचायती काँग्रेस पक्षाच्या ताब्यात आहेत. अर्थात त्यात व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्ती-प्रमाणे स्वत:च्या अस्तित्वासाठी काँग्रेसांतर्गत गटबाजीचेच राजकारण चालत असल्याचे या ठिकाणी प्रकर्षाने जाणवले गेले.

या तालुक्यामध्ये ५ मे, १९९२ पर्यंत पुढील ४६ ग्रामपंचायती कार्यरत अशापध्दतीच्या होत्या - १) गजरेवाडी, २) कुमठे, ३) शेळगी, ४) दहिटणे, ५) हिप्परगे, ६) हगलूर, ७) शेळगी, ८) राळेरास, ९) भोनसळ, १०) देगांव, ११) हिरज, १२) शिवणी, १३) बसवेश्वरनगर, १४) तिन्हे, १५) सोरेगांव, १६) पाथरी, १७) कवठे, १८) देगांव (जीआर), १९) तेलगांव, २०) नंदुर (जीआर), २१) बेलाटी, २२) प्रतापनगर, २३) गावडे दारफळ, २४) नान्नज, २५) पडसाळी, २६) वांगी (जीआर), २७) रानमसले, २८) मार्डी, २९) अकोलेकाटी, ३०) बीबी-दारफळ, ३१) कोंडी, ३२) बाणेगांव, ३३) सेवालालनगर, ३४) नरोटेवाडी, ३५) कारंबा, ३६) पाकणी, ३७) केगांव, ३८) बाळे, ३९) खेड, ४०) भोगांव, ४१) गुळवंची, ४२) वडाळा, ४३) भागाईवाडी, ४४) कव-ढाळी, ४५) साखरेवाडी, ४६) कळमण.

उत्तर सोलापूर तालुका सोलापूर शहराजवळ असल्याने शहरात गिरणी कारखाने येथे काम करुन शहरात घरजागा मिळत नसल्याने जवळच्या गांवातून हा कामगार वर्ग रहातो. त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाच्या दृष्टी-कोणातून "गांव तेथे शाळा" या ~~धोरणा~~ आदेशाप्रमाणे जवळजवळ सर्व खेडेगांवामधून

प्राथमिक शाळा आहेत. त्याचबरोबर प्रत्येक गांवामधून नळपाणी पुरवठा योजनेंतर्गत प्रत्येक गांवास पिण्याच्या पाण्याची सोय शासनाने ग्रामपंचायतीच्या माध्यमातून केली आहे. त्याचबरोबर गांवे ते शहर व एक गांव ते दुसरे गांव या अंतर्गत रस्ते कांही ठिकाणी डांबरी पक्के रस्ते आहेत. तर कांही ठिकाणी कच्चे रस्ते आहेत. शहर जवळ असल्याने ब-याच खेडेगांवातून आठवडा बाजार भरत नाही. सोलापूर शहराचा आठवडा बाजार मंगळवारी भरत असल्याने व सोलापूर महानगरपालिकेने सिटी बसेसची सोय केल्याने बहुतांशी लोक शहरात बाजारासाठी जातात.

सदरहू हद्दवाढ - महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. एस.एम.सी./१५८३-५४२/सी.आर-४५/८३ (पार्ट-१) नांव २५ दि. २३.४.१९९२ अन्वये उत्तर सोलापूर तालुक्यातील खालील गांवासमोर सदरच्या निर्णयामध्ये नमूद केलेल्या जमिनी सर्व्हे नंबर दि. ५ मे, १९९२ पासून सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीत वर्ग करण्यात आलेल्या आहेत. या जमिनीमध्ये ब-याचशा मिळकती या शासकीय मालकीच्या असून त्यांची नोंद गा.न. नं. १ अ, ब, क, ड मध्ये घेतलेल्या असतीलच. अ.नं. व गांवाची नांवे पुढीलप्रमाणे होत - १) शेळगी, २) बाळे, ३) मजरेवाडी, ४) कुमठे, ५) दहिटणे, ६) देगांव, ७) बसवेश्वरनगर, ८) केगांव, ९) शिवाजीनगर, १०) सोरेगांव, ११) प्रतापनगर.

सोलापूर तालुका याच्या उत्तरेस तालुका बार्शी व उस्मानाबाद

KOLHAPUR

जिल्हा पूर्वेस दक्षिण सोलापूर तालुका व उस्मानाबाद जिल्हा, पश्चिमेस मोहोळ तालुका तर दक्षिणेस दक्षिण सोलापूर तालुका येतो. या तालुक्यातून सिना नदी वाहते. एकुरुख किंवा यालाच हिप्परगा तलाव असेही म्हटले जाते. येथून आणि सोरेगांव येथून (जल शुध्दीकरण केंद्र) सर्वत्र पाणीपुरवठा नळाच्या माध्यमातून केला जातो. सोलापूर येथे जे कार्ड चादरी तसेच हातमाग व्यवसाय मोठ्या प्रमाणावर त्यापाठोपाठ विडया तयार करण्याचे उद्योग मोठ्या प्रमाणात चालतात. उत्तर सोलापूर हा शहराजवळचा तालुका असल्याने तेथील रहिवाशांच्या दृष्टीने वरील उद्योगाची ठिकाणी काम मिळने व जीवनाच्या दृष्टीने त्यांचा रोजगाराचा प्रश्न मिटतो.

अध्ययन क्षेत्रासाठी या तालुक्यातील १० गांवे निवडली ती निवडतांना सर्व स्तरातील ग्रामपंचायतींचा अभ्यास करता यावा हे उद्दिष्ट समोर ठेवले होते. त्याचबरोबर विविध रस्त्याकडील गांवे निवडली सोलापूर शहर हे उत्तर सोलापूर तालुक्याचे ठिकाणी केंद्रस्थळी असलेले मोठे शहर आहे. येथून जे विविध मार्ग आहेत त्या मार्गाचा गांवाचा विचार करुन ४६ ग्रामपंचायतीपैकी फक्त १० गांवे निवडली.

यात सोलापूर शहर केंद्रस्थानी आहे. तेथून सोलापूर-मंगळवेढा मार्गावरील तिऱ्हे हे गांव असून येथील श्री हरिभाऊ बळीराम जाधव या उत्तर सोलापूर तालुक्याचे सभापती गांव होय. या गांवात प्राथमिक शिक्षणाबरोबर हायस्कूल असून गांवाच्या एका बाजूने सिना नदी जाते. तेथे बँकेची सोय आहे.

कुमठे हे गांव शहरापासून होटगी रोडवर असून हे सध्या ५ मे, १९९२ पासून सोलापूर शहराच्या हद्दवाढीत समाविष्ट केले गेलेले आहे. या गावचे श्री ब्रह्मदेव माने दादा हे विधान परिषद सदस्य होते. सध्या ते सोलापूर जिल्हा सहकारी बँक याचे चेअरमन आहेत. काँग्रेसनिष्ठ सोलापूर जिल्हा काँग्रेसचे बराच काळ उपाध्यक्ष होते. त्यांनी गांवच्या विकासासाठी भरपूर योजना कार्यान्वित आणल्या. सध्या हा भाग हद्दवाढीत गेल्याने आम्हा गांवक-यांना आई जेवू देईना, वडिल भीक मागू देईना." या अवस्थेप्रमाणे ग्रामपंचायत अस्तित्वात नाही तर महानगर-पालिका आमच्या विकासाकडे दुर्लक्ष करत आहे. अशा अवस्थेत गांवकरी राहतात. मात्र या गांवाजवळ शिवाजी वर्क्स हा मोठा कारखाना आहे. लक्ष्मी विष्णू मिल, जामश्री मिल, नरसिंग गिरजी मिल येथे बरेच लोक कामांस येत असतात. गांव शहरालगत असून येथे माध्यमिक विद्यालय, ज्युनियर कॉलेज, तांत्रिक कोर्सेस याची सोय आहे. तसेच बँक, अंतर्गत रस्ते, ग्रामसफाई उत्कृष्ट होत होती.

गुळवंची, नान्नज, वडाळा ही गांवे सोलापूर बार्शी रस्त्यावर असून यातील नान्नज हे गांव द्राक्ष बागांसाठी सर्वत्र प्रसिध्द आहे. येथे सिडलेस वगैरे द्राक्षांच्या अनेक बागा आहेत. या गांवात ३ बँका, बाजार-पेठ मोठया स्वरुपाची असून सधन व्यक्तींचे प्रमाण जास्त आहे. येथे माध्यमिक शाळा, आहे. गांवाजवळच अभयारण्य असून ते अतिशय नयनरम्य असे आहे. येथील अनेक शेतकरी प्रगत अशा प्रकारची शेती करतात. गुळवंची त्यामानाने मागास गांव म्हणावे लागेल. येथे स्थानिक गटबाजीचे प्रमाण अधिक आहे. त्याचबरोबर वडाळा हे गांव श्री बळीराम

काका साते यांचे असून येथे २ बँका, माध्यमिक शाळा, ज्युनियर कॉलेज, अध्यापक विद्यालय, स्काऊट गाईड प्रशिक्षण केंद्र, कुक्कुटपालन केंद्र, अशा अनेकविध सुविधा आहेत. मात्र येथील सध्या अंतर्गत वातावरण गढूळ झाल्याने तात्पुरत्या स्वरूपाची पोलीस चौकी उभा केलेली आहे.

सोरेगाव व प्रतापनगर ही गांवे तशी सोलापूर विजापूर रस्त्यावर असून येथे सोरेगांवला जलशुध्दीकरण केंद्र आहे. येथून सर्वत्र पाणीपुरवठा नळपाणी पुरवठयाच्या माध्यमातून केला जातो. येथील बरेचशे लोक सोलापूर महानगरपालिकेत मिलमध्ये, कारखान्यामध्ये कामांस जातात. या गांवात माध्यमिक शाळा आहे. या गांवात कन्नड भाषिकाचे प्रमाण जास्त आहे. प्रतापनगर हा गांव सर्वात मागासलेला आढळला. येथे जो सरपंच आहे तो गांवात राहत नसून इतरत्र राहतो, घाणीचे साम्राज्य, अंतर्गत रस्ते नाहीत. दिवाबत्ती कधीतरी लावली जाते इ. अनेक विध समस्यातून जीवन कंटतात. येथे लमाण जमातीचे लोकांचे प्रमाण अधिक आहे. येथील लोक शहरात नोकरीस जातात तर बरेचशे देशी दारु गाळणे व विक्री करणेचा व्यवसाय करतात. येथे शिक्षणाबाबत उत्कटता जास्त वाटली नाही. जे शिकलेले आहेत त्यांना समाजाबाबत कांही सोयरसुतक नसावे असे आढळते.

मार्डी, भोगांव, बाणेगांव ही गांवे तशी बरी वाटली यात मार्डी यां गांवी यमाई देवी मंदिर पुराणात याचा उल्लेख आलेला आहे असे सुंदर असून येथे बागायत जमिनी ब-यापैकी आहेत. या गावी शिवसेना पक्षाचे वर्चस्व आढळले. येथे माध्यमिक शाळा, बँक, विकास सोसायटी चांगल्या-

रितीने चालल्याचे आढळते. गांव थोडे उंचवट्यावर माळरानावर अ असल्याने अंतर्गत रस्ते म्हणावे तितके व्यवस्थित आढळले नाहीत. भोगाव हे अत्यंत छोटे गाव असून येथे धनगर समाज जास्त प्रमाणात इतर कोणत्याही सोयी उदा. माध्यमिक शिक्षण, साफसफाई, अंतर्गत रस्ते व्यवस्थित आढळले नाहीत. बाणेगांव हे गांव मात्र महाराष्ट्र राज्य शासनाने आदर्श गांव या पुरस्काराने गौरविलेला गांव आहे. येथील सरपंच श्री. ढोणे हे स्वातंत्र्य सैनिक आहेत. पूर्वीचे कॉंग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते मात्र सध्या पक्षातील परिस्थितीने पक्षास कंटाळलेले गांवाच्या स्थापनेपासून आजतागायत सरपंचपदी विराजमान आहेत. गांवचे वैशिष्टये असे आहे की ग्रामपंचायत आजपर्यंत एकदाही निवडणूकीच्या प्रक्रिया येथे झाल्या नाहीत. सर्व निर्णय गांवातील वयस्क, नेतेमंडळी, सर्व समाजाचे प्रमुख यांची जी ग्रामसभा ती भरवून तेथे घेतले जातात. या गांवात जरी माध्यमिक शाळा नसली तरी येथील मूले-मूली माढी येथे जाताना आढळतात. बाणेगांवात प्रत्येक घरास जाण्यास अगदी सरळ असा रस्ता त्याच्या दुतर्फा घाणपाण्याच्या गटारी, गांवठाण, स्मशानभूमी, पाण्याची सोय, गांवात बँक, ग्राम-पंचायत ऑफिस आदि बाबी खरोखरच वैशिष्टयपूर्ण अशा प्रकारच्या आढळल्या.

उत्तर सोलापूर तालुक्याच्या समग्र अभ्यासाच्या दृष्टीने ४६ ग्राम-पंचायतीपैकी वरील १० ग्रामपंचायती निवडल्या. ते निवडतांना ४६ पैकी ११ ग्रामपंचायती ५ मे, १९९२ पासून सोलापूर महानगरपालिकेच्या हद्द-वाढीत गेल्या आहेत. उरलेल्या ३५ पैकी ७ आणि हद्दवाढीतील ११ पैकी

३ ग्रामपंचायती वेगवेगळ्या दृष्टीने वैशिष्टयपूर्ण वाटणाऱ्या, वेगवेगळ्या मार्गावरील ग्रामपंचायती प्रतिनिधीक अशा प्रतिनिधीत्व करणाऱ्या ग्रामपंचायती म्हणून याठिकाणी अभ्यासास घेतल्या गेलेल्या आहेत.

अध्ययन पध्दती व कालखंड :

अध्ययनासाठी निवडलेला जो विशिष्ट असा प्रादेशिक भाग तालुका आहे याचे नैसर्गिकदृष्टया व भौगोलिक माहितीबाबत ग्रंथ, अहवाल याचबरोबर प्रत्यक्ष ग्रामपंचायतींची माहिती तीचा विकास कार्य करण्याच्या पध्दती, तिचे ग्रामसुधारणा इ. बाबतचे कार्याची माहिती मिळविण्यासाठी प्रामुख्याने प्रश्नावली, मुलाखती, प्रत्यक्ष पाहणी या पध्दतींचा अवलंब करावा लागेल.

अध्ययनासाठीचा कालखंड घेतांना सद्य:स्थितीबाबत प्रत्यक्ष दर्शन व सकृतदर्शनी पुरावा हा ग्राह्य मानला आहे. त्याचबरोबर ग्रामपंचायत स्थापनेपासून आजतागायत ग्रामपंचायतीबाबत मत इतर गांवाचे तर हद्दवाढीत विलीन झालेल्या ५ मे, १९९२ पूर्वीच्या ग्रामपंचायती बाबत मत आणि सध्या सोलापूर महानगरपालिका यांचे कार्यक्षेत्र असल्याने त्यांच्यापुढे कांही नविन सुविधा मिळाल्या का ? ग्रामपंचायत होती ते ठीक होते का आता सध्याची परिस्थिती योग्य वाटते. याबाबतचा संपूर्ण भाग हद्दवाढीत गेलेल्या ग्रामपंचायतीच्या कार्याची घसरण या बाबीत सद्य:स्थितीबाबतचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात केला गेलेला आहे.

वरील ग्रामपंचायतीच्या कार्याबद्दल माहिती घेतांना प्रामुख्याने

३ तलाठी, २ ग्रामसेवक, १ सरपंच, १३ ग्रामपंचायत सदस्य, १७ शिक्षक, शिक्षिका तर ६४ सामान्य नागरिक यांच्या मुलाखती घेतल्या. यात फक्त १६ स्त्रियांनी मुलाखती दिल्या. त्याही घाबरत घाबरत कारण जवळजवळ सर्वत्र गांवामधून पुरुष प्रधान कुटुंब पध्दती आणि एकत्र कुटुंब पध्दतीचे प्रमाण जास्त असल्याने एकतर ग्रामीण स्त्रियांमध्ये अशिक्षितांचे प्रमाण मूळातच जास्त आणि त्यात कौटुंबिक असे वातावरण यामुळे मुलाखती देण्यास स्त्रियां जास्त धजावत नसल्याचे आढळते. त्यांच्यावर एक मानसिक दबाव असा की, या मुलाखतीतून उद्या मला वा माझ्या कुटुंबाला कांही त्रास तर होणार नाही ना ? त्यामुळे कांही स्त्रीयांच्या तोंडून घरातील व्यक्तींनी लादलेली उत्तरे वा विचार मुलाखतीवेळी मिळाले.

........

## प्रकरण चौथे

### संदर्भ

१) सोलापूर गाईड - श्री उदगीरी विनायक, पृ. क्र. २१.

२) श्री शितोळे हरिभाऊ - सोलापूर जिल्हा दर्शन, पृ.क्र. १२१.

३) महाराष्ट्र शासन - गॅझेटीयर

४) महाराष्ट्र शासन - सोलापूर जिल्हा (महाराष्ट्रातील जिल्हे)

५) जिल्हा सांख्यिकी कार्यालय - सोलापूर

६) १९५३ आबासाहेब शतसांवत्सरी ग्रंथ - म.न.पा. नकाशा

७) सोलापूर जिल्हा नकाशा

८) तालुका उत्तर सोलापूर नकाशा

९) तहसिलदार उत्तर सोलापूर-प्रपत्र

१०) दैनिक - तरुण भारत

११) सामान्य भूगोल - ३री सोलापूर जिल्हा - म.रा.पा.पु.निर्मिती मंडळ, पुणे.